b/c

महाराष्ट्र शासन

क्रमांक:- एनजीसी-२००५/(३८२/०५)/ मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक:- १ जुलै, २००५

प्रति,
कुलसचिव,
एस.एन.डी. टी. विद्यापीठ,
मुंबई

विषय:- **मेहमूदा शिक्षण आणि महिला ग्रामीण विकास बहुउद्देशिय संस्था, नागपूर अध्यापक महाविद्यालय सुरु करण्याबाबत..**

संदर्भ:- राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, भोपाळ यांचे क्र. WRC/२-३२/६५/ २००४/७३८८, दि. २६ ऑक्टोबर, २००४.

महोदय,

राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, भोपाळ यांनी त्यांच्या दि. २६ ऑक्टोबर, २००४ च्या पत्रान्वये **मेहमूदा शिक्षण आणि महिला ग्रामीण विकास बहुउद्देशिय संस्था, नागपूर** या संस्थेस गोधनी, नागपूर येथे अध्यापक महाविद्यालय सन २००४-०५ या वर्षापासुन काही अटी व शर्तींवर मान्यता दिली आहे. सदर मान्यता लक्षात घेऊन उपरोक्त संस्थेस शासनाकडे भविष्यात अनुदानासाठी वा इतर आर्थिक बाबीसाठी मदत मागणार नाही अशा आशयाचे हमीपत्र एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई व सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांचेकडे सादर करण्याच्या अटीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (५) नुसार सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विना अनुदान तत्वावर** नवीन अध्यापक (बी.एड.) महाविद्यालय (१०० प्रवेश क्षमता) सुरु करण्यास खालील अटी व शर्तींवर मान्यता देण्यात येत आहे.

१. एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.
२. संबंधित संस्थेस शासनाने नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे काय, तसेच एन.सी.टी.ई. भोपाळ यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा विद्यापीठाने करणे आवश्यक राहील.

२. वरील अटींबाबत खातरजमा केल्यानंतरच विद्यापीठाने संलग्नीकरण देण्याबाबतची आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करुन पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक यांना कृपया पाठवावा.

आपला,

(बि. वा. सुतार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर./ मुंबई विभाग, मुंबई
खाजगी सचिव, मा. मंत्री (उच्च शिक्षण)
खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.)
अध्यक्ष, **मेहमूदा शिक्षण आणि महिला ग्रामीण** विकास बहुउद्देशिय संस्था, नागपूर
निवड नस्ती - मशि-३

Mehmooda Shi. & Mahila Gr. Vi. Bn. Sanstha, Nagpur

CENTRAL INDIA WOMEN'S COLLEGE OF EDUCATION * GODHANI * AFFILIATED TO SNDT

Principal
Central India Women's College of Education
Nagpur.